**पी.जी.ए. क्र.१९/२०१९**
**निशाणी क्रं.यू–७**

**विरुध्द पक्षकारातर्फे ॲड. श्री.यू.बी.जाधव यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

मी अर्जदार यांच्याकडे काम करीत होतो. अर्जदार यांचा पत्ता ४/१६ इलाईट गार्डन्स, औंध, पुणे असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर्मचा–यांचे हजेरीपत्रक पुणे येथील कार्यालयात आहे. मी अर्जदार यांच्याकडे १९८७ मध्ये नोकरीस लागलो. हे म्हणणे खरे आहे की, मी पुणे येथील ऑफिसमध्ये नोकरीस लागलो. हे म्हणणे खरे आहे की, माझा पगार पुणे ऑफिसमधून मिळत होता. मी स्वत: होवून राजीनामा दिला आहे. मला प्रॉव्हिडंट फंड मिळाला आहे. सदरचा प्रॉव्हिडंट फंड पुणे येथील ऑफिसमधून मिळाला. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांची कोल्हापूर येथे शाखा नव्हती आणि नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुणे येथील ऑफिसमध्येच काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कोल्हापूर येथे काम करीत आहे असा कंपनीने आदेश दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार कंपनीमध्ये केवळ ६ कामगार काम करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोल्हापूर येथे काम केले आहे असे दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला उपदान अर्ज क्र. १९/२०१९ चालण्यास पात्र नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माझा शेवटचा पगार रू. २०,०००/– होता हे दाखवण्याकरीता बॅंकेच्या खातेउता–याशिवाय पुरावा दाखल केला नाही. मी पुणे शाखेच्या बॅंकेचा खातेउतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, फॉर्म–आय नोटीसमध्ये शेवटचा पगार रू. १५,०००/– आणि २०,०००/– असे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेवटच्या पगारातील मुळ पगार आणि इतर भत्ते सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विपकडे १०० पेक्षा जास्त कामगार काम करताता हे दाखवण्यासाठी पुरावा दाखल केला नाही. विपकडे १० किंवा १० पेक्षा जास्त कामगार काम करतात हे दाखवण्याकरीता पुरावा मी दाखल केला नाही, तो करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्ज आणि परिशीष्ट मधील मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात चालण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, विपने दाखल केलेले म्हणणे खरे व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही

की, विप कंपनीकडे केवळ ६ कामगार काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी विपकडून उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

कोल्हापूर.<br>दिनांकः—०६/०१/२०२६

( के. बी. कामगौडा )<br>नियंत्रण अधिकारी,<br>कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.